# पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी

## जाहीर निविदा

**निविदा सूचना :- — निविदा क्र. १** **( सन २०२६-२०२७ )**

**स्वारस्य अभिव्यक्ती (EOI-EXPRESSION OF INTEREST)**

भटक्या व मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण व रेबीज रोगाचे लसीकरण करण्याकरिता जिल्हा परिषद रत्नागिरी मार्फत ग्रामीण भागातील भटक्या व मोकाट कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन असून भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ यांच्या मान्यता प्राप्त संस्थाकडून सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून नसबंदी शस्त्रक्रियासाठी स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव करिता नोंदणीकृत संस्थाकडून ( ऑफलाईन ) निविदा मागविण्यात येत आहेत.

वरील नमूद निविदा दि.१५/०५/२०२६ रोजी वेळ सकाळी १०.०० वा पासून दि. ३०.०५.२०२६ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत ऑफलाइन पध्दतीने स्वीकारणेत येतील व दि. ०१.०६.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील.

१. इसारा रक्कम निविदा रक्कमेच्या 3%, निविदा फॉमर्चा फी रु 500 (+ GST निविदा रकमेच्या 2%) भरणेत यावी.
२. निविदा दि._१५.०५.२०२६ रोजी वेळ सकाळी १०.०० वा पासून ते दिनांक ३०.०५.२०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
३. सदर निविदा दि. ०१.०६.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील .
४. निविदेमधील कोणत्याही अटी व शर्थी शिथील करणे अथवा त्या अनुषंगिक अंतिम निर्णय घेण्याचा तसेच निविदा संपुर्ण अथवा अंशत: मंजूर करण्याचा अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांना राहील.त्या संबंधी संस्थेस कोणत्याही न्यायालयात अथवा इतर प्राधिकरणाकडे दाद मागता येणार नाही.
५. भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ (AWBI)यांच्या मान्यते नुसार भटके व मोकाट कुत्र्यांच्या नसबंदी ( Spaying & Castration) शस्त्रक्रिया करणे, लसीकरण करणे यासाठी रु.1450/- प्रति श्वान हा दर निश्चित केला आहे व भटक्या व मोकाट कुत्रे नसबंदीसाठी पकडणे व शस्त्रक्रियेनंतर पुन्हा त्याच जागेवर सोडणे यासाठी रु 200/- प्रती श्वान असा एकूण 1650/- रुपये खर्च निश्चित केलेला आहे.
६. अधिक माहितीसाठी संपर्क – जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय, रत्नागिरी
संपर्क क्रमांक - ०२३५२-३५०७१५ / 9763707892
अटी व शर्ती लागू.

जिल्हा उपायुक्त
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
जिल्हा परिषद रत्नागिरी

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी